
ISSN: 2249-894X Impact Factor : 5.7631(UIF)
Volume - 8 | Issue - 3 | December - 2018
REVIEW OF RESEARCH
International Online Multidisciplinary Journal
UGC APPROVED
Journal No.: 48514

# २० व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारणेचे अग्रणी – डॉ. बाबासाहेब आंबेडकर



डॉ. उत्तम छाजू राठोड

डॉ. उत्तम छाजू राठोड
सहयोगी प्राध्यापक,
नूतन महाविद्यालय, सेलू, ता. सेलू, जि. परभणी.

प्रस्तावना : प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतचा भारताच्या इतिहासात दलित समाज हा अत्यंत मागासलेला आणि अधिकारशून्य समाज असलेला आपल्याला दिसून येतो. हजारो वर्षांपासून या दलितांवर व शैक्षणिकदृष्ट्या ...........

Editor - In - Chief - Ashok Yakkaldevi

Scanned with OKEN Scanner

International Online Multidisciplinary Journal
REVIEW OF RESEARCH
ISSN NO: 2249-894X

Review of Research (ROR) Journal is an Online International Multidisciplinary Research Journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the Editorial Board. Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## OUR CHIEF EDITORS

India



Ashok Yakkaldevi

Iran



Bijan Goodarzi

Bucharest



Ecaterina

Sri-lanka



Kamani Perera

## Associate Editors



Dr. T. Manichander




Sanjeev Kumar Mishra


## Associated and Indexed, India

- MENDALEY
- ENDNOTE
- GOOGLE SCHOLAR
- ZOTERO
- CITULIKE
- DRJI

Scanned with OKEN Scanner




ISSN NO:- 2249-894X Impact Factor : 5.7631(UIF) Vol.- 8, Issue - 3, December-2018

## Content


| Sr. No. | Title and Name of The Author (S) | Page No. |
|---|---|---|
| 1 | २० व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारणेचे अग्रणी - डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>डॉ. उत्तम छाजू राठोड | 1 |
| 2 | Traumatic Experience Of Survivors In Singer's Enemies, A Love Story<br>Dr. Kiran S. Khandare | 5 |
| 3 | आम्ही काबाडाचे धनी : बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट<br>डॉ. राजाराम राठोड | 8 |
| 4 | An Econometric Analysis Relating To The Determinants Of Agriculture Distress Conditions In The Vizianagaram District Of Andhra Pradesh<br>Prof. M. Sundara Rao (RTD) and Dr. P.Srinivasa Rao | 15 |
| 5 | Anthropocentrism In Matthew Arnold's Poem The Death Of Sohrab<br>Prof. Dr. B. A. Kamble | 25 |
| 6 | Influence Of Time And Stress Of B.Ed. Teacher Trainees Towards Their Academic Achievement<br>M.Vijayalakshmi | 28 |
| 7 | The Unspeakable Love: Subaltern Issues In *A Married Woman*<br>Dr. Shantilal Indrabhan Ghegade | 38 |
| 8 | An Approach To Raja Rao's *The Cat And Shakespeare*<br>Dr. Kalyan Dnyaneshwar Sonawane | 42 |
| 9 | Library Automation In India - A Brief Historical Perspective<br>Dr. Tushar M. Patil | 46 |


Scanned with OKEN Scanner

REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# २० व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारणेचे अग्रणी - डॉ. बाबासाहेब आंबेडकर



डॉ. उत्तम छाजू राठोड
सहयोगी प्राध्यापक,
नूतन महाविद्यालय, सेलू, ता. सेलू, जि. परभणी.

## प्रस्तावना :

प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतचा भारताच्या इतिहासात दलित समाज हा अत्यंत मागासलेला आणि अधिकारशून्य समाज असलेला आपल्याला दिसून येतो. हजारो वर्षांपासून या दलितांवर व शैक्षणिकदृष्ट्या अन्याय, अत्याचार झालेत. धर्माच्या नावावर या समाजावर सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या अनन्वित अन्याय, अत्याचार झालेत. त्याचबरोबर त्यांचे शारीरीक व मानसिक शोषण करून त्यांना पशूचे जीवन जगण्यास भाग पाडले. प्राचीन काळापासून अस्पृश्यता अस्तित्वात होती. परंतु अस्पृश्यता नेमकी केव्हा उदयास आली? तीचा निश्चित काळ कोणता? यासंदर्भात कोणताच पुरावा मिळत नसल्यामुळे अस्पृश्येचा काळ निश्चित करणे कठीण आहे. धर्मसूत्राच्या काळात अस्पृश्यता नव्हती. परंतु 'अपवित्रता' मात्र होती. अस्पृश्यतेच्या उदयासंबंधात डॉ. रामचरण शर्मा यांनी सांगितले आहे की, "अस्पृश्यतेचा उदय मौर्यपूर्व काळाच्या उत्तरार्धात झाला."[१] तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेच्या उदयाचा काळ अंदाजे इ.स. ४०० हा निश्चित केला. चंद्रगुप्त दुसरा यावच्या काळांत इ.स.३९९ मध्ये फाहियान हा बौद्धधर्माचा अभ्यास करण्यासाठी भारतात आला होता. त्याच्या भारतातील १५ वर्षांच्या वास्तव्यात तो वेगवेगळ्या ठिकाणी फिरला. त्याच प्रवासवर्णनात तो लिहितो की, 'भारतातील लोक धर्मपरायण आणि विद्याप्रेमी आहेत. ते परस्परांवर प्रेम करतात. ते अहिंसावादी आणि सत्यवादी आहेत. ते शिकार करीत नाहीत व ते मांस, लसूण, कादा आणि दारू या पदार्थाचे सेवनही करीत नाहीत. चांडाळ आणि निम्न जातीतील लोक या पदार्थाचे सेवन करतात. लोक त्यांना घृणास्पद मानतात. त्यांची वस्ती नगराच्या बाहेर असते. एवढचे नाही तर अस्पृश्याला चालते-बोलते स्मशानच ठरविले. त्याला अमंगल पशुपेक्षाही नीच आणि हीन ठरविले. गावाबाहेर घाणीत त्यांची वस्ती वसविली. कुत्री, गाढवे, डुकरे त्यांच्या सोबतीला दिलीत. कथिल, पितळ व लोखंडाचे अलंकार त्यांच्या अंगावर चढविले.'[२]

१९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या कालखंडात पेशवाईचा शेवट झाला असावा तरी, 'महाराष्ट्रातील इतर कोणत्याही प्रांतापेक्षा प्रामुख्याने कोकणातील अस्पृश्यांवर फार मोठ्या प्रमाणावर अन्याय-अत्याचार झाले. तसेच या भागातील अस्पृश्यांची स्थिती अत्यंत दयनीय होती.'[३] त्यांच्या स्थितीत सुधारणा व्हावी यासाठी महाराष्ट्रातील अनेक समाजसुधारक संस्था आणि संघटना या कार्यात पुढे आल्या. यामध्ये महात्मा जोतिराव



Scanned with OKEN Scanner

फुले, श्रीमंत सयाजीराव गायकवाड, छत्रपती शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, न्यायमूर्ती रानडे, रामकृष्ण भांडारकर, सर चंदावरकर इत्यादींचा समावेश होतो.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून बऱ्याच समाजसुधारकांनी अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते, परंतु या समाजसुधारकांनी फक्त स्पृश्यांच्या मतपरिवर्तावर भर दिला होता, मात्र त्याला अपवाद महात्मा जोतिराव फुले यांचा सांगता येईल. 'आंबेडकरपूर्व काळात दलितांच्या न्याय्य हक्कांसाठी दलितांची चळवळ उभारून त्यांच्या हक्कांसाठी लढा देण्याकरीता दलितांमधूनच काही कार्यकर्ते आणि पुढारी पुढे आले. महात्मा फुले यांच्यापासून प्रेरणा घेऊनच गोपाळबाबा वलंगकर यांनी अस्पृश्य समाजात जागृती व्हावी, त्यांना शिक्षणाचे महत्व समजावे, म्हणून कोकणात आणि कोकणाबाहेरही अस्पृश्यांच्या सभा भरविल्या.'[४] त्यानंतर शिवराम जानबा कांबळे, विठोबा रावजी मून संतपंडे, किसन फागू बनसोड, कालीचरण नंदागवळी, गणेश अक्काजी गवई इत्यादींनी आंबेडकरपूर्वक काळात आपल्या कुवतीप्रमाणे कार्य केले. या सर्वांनी दलितांच्या समस्या समाजासमोर आणल्या, एवढेच नाही तर त्या त्यांनी सोडविण्याचा प्रयत्न केला.

विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित चळवळीचे नेतृत्व स्वतः केले होते आणि दलितांच्या समस्यांना वाचा फोडतानाच त्यांना त्यांचे अधिकार मिळवून देण्यासाठी महाराष्ट्रात चळवळी उभारल्या. महाराष्ट्रातील दलितांच्या या चळवळीत संपूर्ण दलित समाज व इतरही महाराष्ट्रातील लोकांचा समावेश होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या चळवळीला महाराष्ट्राच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. या चळवळीमुळेच दलितांना त्यांचे मानवीय हक्क प्राप्त झाले असल्याचे दिसून येते.

शारदा देशमुख यांनी अस्पृश्यतेच्या संदर्भात म्हटले, 'पेशवाईत आचारधर्माचे नुसते स्तोम माजविल्याने माणुसकीला काळीमा फासणारे आचारधर्माच्या नावाखाली बोकाळले होते. अंत्यज वर्गाला स्पर्श करणेही पाप मानले जात असे. एवढेच नव्हे तर त्यांच्याशी बोलणे किंवा त्यांची सावली अंगावर पडू देणे म्हणजे 'अब्रम्हण्यम्' अशा अस्पृश्य बांधवांना देवळात मज्जाव, पाणवठ्यावर मज्जाव, शाळेत मज्जाव अशा कोट्यवधी हिंदू बांधवांना हिंदू धर्मापासून वंचित व हिंदू समाजापासून बहिष्कृत केलेले असे. असे म्हणतात की, पेशवाईच्या काळात अस्पृश्यांच्या गळ्यात थुंकण्यासाठी मडके व आपल्या पायाखालील रस्ता साफ करण्यासाठी कमरेला झाडाची फांदी बांधलेली असे. दारिद्र्य, अपमान, छळ हे तर अस्पृश्य समाजाच्या पाचवीलाच पूजलेले असत.'[५]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पेशवाईपासून ते इ.स. १९३६ पर्यंतच्या काळात अस्पृश्यता कशा प्रकारची होती, याचे सविस्तर विवेचन पुराव्यासहित 'Annihilation of Caste' या आपल्या ग्रंथात केले आहे. अस्पृश्यतेच्या संदर्भात ते म्हणतात, 'मराठा देशातील पेशवाईच्या काळात सार्वजनिक रस्त्याचा वापर करण्यास अस्पृश्यांना मुभा नव्हती; कारण एखादा सवर्ण हिंदू जर त्या रस्त्याने आला तर अस्पृश्याच्या सावलीने त्याला विटाळ होईल. अस्पृश्यांना त्यांचे चिन्ह किंवा खूण म्हणून आपल्या मनगटावर अथवा गळ्यात काळा दोरा बांधावा लागत असे.'[६]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतः या जातीत जन्मलेले असल्यामुळे त्यांनाही या व अशा घटनेच्या प्रसंगांना सामोरे जावे लागले होते. त्यामुळे त्यांच्याही मनात अस्पृश्यांच्या होत असलेल्या अन्यायावर वाचा फोडण्यासाठी व त्यांना त्यांचे मानवीय अधिकार मिळवून देण्यासाठी अन्यायाच्या विरोधात आवाज उठविला. अशा या विषम परिस्थितीत पिढ्यानपिढ्या पशुंसारखे जीवन जगत असलेला अस्पृश्य समाज हळूहळू जागृत होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात आपल्या हक्कांसाठी संघर्ष करू लागला. ही काही साधी गोष्ट



Scanned with OKEN Scanner

नव्हती. ही अस्पृश्यांमध्ये घडून आलेली मोठी वैचारीक क्रांती होती आणि या क्रांतीचे जनक होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांनी अस्पृश्यांना त्यांच्या गुलामीची जाणीव करून देऊन त्यांना विद्‌यमान समाज व्यवस्थेतील अन्यायाच्या विरोधात संघर्ष करायला प्रवृत्त केले. हा संघर्ष अस्पृश्यांच्या मानवीय हक्कांच्या मागणीसाठी होता.

अस्पृश्यांना त्यांचे मानवीय अधिकार मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता प्रस्थापित व्हावी, म्हणून सामाजिक व धार्मिक भूमिका घेतली. त्यांनी त्यांच्या कार्यात प्रामुख्याने सत्याग्रहाला अधिक महत्व दिले, ज्यामध्ये कोकणातील महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह व नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह व त्यांच्या प्रेरणेने झालेले अंबादेवीच्या देवळातील अमरावती येथील सत्याग्रह, पर्वतीचा पुणे येथील सत्याग्रह व मुखेड गावचा सत्याग्रह अतिशय महत्वाचे ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सत्याग्रहाच्या माध्यमातून अस्पृश्यांना त्यांचे मानवीय अधिकार मिळवून द्‌यावयाचे होते व त्याचबरोबर स्पृश्य हिंदूंच्या मनात परिवर्तन घडवून आणावयाचे होते, परंतु ते पूर्णतः साध्य होऊ शकले नाही आणि म्हणूनच जो परमेश्वर आपले रक्षण करीत नाही, आपले दर्शनही आम्हांला देत नाही, अशा परमेश्वराच्या नादी आपण का लागावे असा नकारात्मक विचार अस्पृश्यांच्या मनात निर्माण झाला. या सर्वांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनावर खोल परिणाम झाला. 'जो धर्म व त्याचे अनुयायी आम्हांला माणुसकीचे जीवन जगू देत नाहीत, अशा धर्मात आपण का रहावे', याचा गंभीरपणे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर करू लागले. यामुळेच त्यांच्या मनात धर्मांतराचा विचार बळावत गेला. दि. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवले मुक्कामी हिंदू धर्माला प्रचंड मोठा हादरा दिला व त्याची यशस्वीता २१ वर्षांनंतर दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर मुक्कामी बौद्ध धर्माचा स्वीकार करून पूर्ण केली. नागपूर व चंद्रपूर येथे ८ लाख लोकांसमवेत बौद्ध धर्माची दीक्षा घेतली व मानवमुक्तीचा लढा यशस्वी केला. बौद्ध धर्माचा स्वीकार केलेल्या सर्वांनी विज्ञानास अनुसरून आपली वेगळी ओळख हिंदू समाजास करून दिली आहे.

## सारांश-

१९व्या व २०व्या शतकातील सामाजिक, आर्थिक व धार्मिक सुधारणेच्या चळवळीतील आंबेडकरपूर्व दलित चळवळीने अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले व लोकांना त्यांच्या अधिकाराप्रती जागृत केले. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी, मानवमुक्तीसाठी केलेल्या चळवळी, सत्याग्रह यांना इतिहासात अत्यंत महत्वाचे स्थान आहे आणि म्हणूनच अस्पृश्यांची आजची सर्वांगीण प्रगती अत्यंत लोकप्रिय होऊ लागलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमुळे बौद्ध बनलेल्या समाजाने स्व-उत्थान फार मोठ्या प्रमाणावर केले आहे, ज्यामध्ये सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक व अन्य सर्वच क्षेत्रांमध्ये आधुनिक काळातील बौद्धांनी आपली प्रगती केलेली आहे, यात शंका नाही.

## संदर्भ-

१) डॉ. शर्मा रामशरण, 'शुद्रों का प्राचीन इतिहास', ग्रंथ शिल्पी प्रकाशन, नवी दिल्लीः (२००५), पृष्ठ ३४
२) डॉ. गेडाम टी. जी., 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मांतर', शारदा गेडाम, नारी रोड, आवळेनगर, नागपूरः पृष्ठ ६



Scanned with OKEN Scanner

३) डॉ. निकुंभे सी. एच., 'समाजप्रबोधनकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर', सुगावा प्रकाशन, पुणेः (१४ एप्रिल २००५), (प्रथम आवृत्ती) पृष्ठ १५
४) किता पृष्ठ १४
५) देशमुख शारदा, 'शिवकालीन व पेशवाईतील स्त्रीजीवन', श्री. देशपांडे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणेः १९७३, पृष्ठ ८७
६) Dr. Ambedkar B. R., 'Annihilation of Caste', Jalandar Bhimpatrika Publication (1968), Page 22
७) डॉ. गेडाम टी. जी., 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर', शारदा गेडाम, नारी रोड, आवळेनगर, नागपूरः पृष्ठ १६५



Scanned with OKEN Scanner